# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र. 190/2024                    दिनांक : 30.05.2024

## 1)खुन :–

**किनवट :–**दिनांक 29.05.2024 रोजी 15.45 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरी आंबाडी ता. किनवट जि. नांदेड येथे**, यातील नमुद **फिर्यादीचा मयत भाऊ नामे वसीम कुरेशी महबूब कुरेशी, वय 29 वर्षे, रा. इस्लामपुरा किनवट ता. किनवट जि. नांदेड**, हा यातील नमुद आरोपीच्या घरी मिस्त्री काम करीत असताना आरोपीस पिण्याचे पाणी मागितले असता आरोपीने त्यास फावडयाने डोक्यावर, तोंडावर मारून खुन केला. वगैरे **फिर्यादी मोबीन कुरेशी महबूब कुरेशी, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. इस्लामपुरा किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 140/2024 कलम 302 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री चोपडे, मो.नं. 9823162824** हे करीत आहेत.

## 2)खुनाचा प्रयत्न :–

**मुक्रामाबाद :–** दिनांक 29.05.2024 रोजी 13.45 वा. चे सुमारास, **शिवाजी कॉलेज रोड डॉक्टर रेड्डी यांचे दवाखान्या समोर मुक्रामाबाद ता. मुखेड जि. नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी गेल्या पाच दिवसापुर्वी झालेल्या भांडणाचा मनात राग धरून फिर्यादीस शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या उद्देशाने हातातील तिक्ष्ण हत्यार खंजरने फिर्यादीचे पाठीत छातीला, हाताला, डोक्यात, पायावर मारून गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला व साक्षीदार सोडवण्यास आला असता त्याला पण मारहाण करून गंभीर जखमी करून शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी कृष्णा सुरेश बनबरे, वय 20 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. ईटग्याळ ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 90/2024 कलम 307,323,504,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री अमर केंद्रे, मो.क्रं. 8275799032** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**1)विमानतळ :–**दिनांक 29.05.2024 रोजी 00.30 वा. चे सुमारास, **विमानतळ टी पाईंट जवळील बौध्द विहराचे बाजुस रोडवर, नांदेड येथे**, यातील फिर्यादीस यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून जुण्या वादाचे कारणावरून फिर्यादीस लाथाबुक्यांनी व हातातील तलवारीने, दगडाने फिर्यादीस मारहाण करून गंभीर दुखापत केली व डोळयात मिरची पावडर टाकली मारहाण केली व शिवीगाळ केली जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी रवि रमेश हाडसे, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. त्रिरत्ननगर सांगवी बु. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमातनळ** गुरन 166/2024 कलम 326,,504,506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री पुरी, मो. नं. 8668543100** हे करीत आहेत.

**2)किनवट :–**दिनांक 24.05.2024 रोजी 04.00 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरासमोर निचपुर ता. किनवट जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीस यातील नमुद आरोपीने तू माझे घरासमोरून येऊन काय बघतोस तू वारंवार माझ्या घरासमोरून का जातो असे म्हणुन शिवीगाळ करीत कॉलर धरून हातात काठी घेवून फिर्यादीस पाठीवर, कमरेवर, पायावर मारहाण करून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी दुलसिंग मोहन पवार, वय 35 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. निचपूर ता. किनवट जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 139/2024 कलम 326,324,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1954 मुंडे, मो. नं. 7721848430** हे करीत आहेत.

**3)उस्माननगर :–**दिनांक 27.05.2024 रोजी 10.00 वा. चे सुमारास, **मौजे वाळकी गावात कापसी चौक ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीस यातील नमुद पाच आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवून फिर्यादीस तू आमचे कुत्र्यास दगड का मारला या कारणावरून फिर्यादी व फिर्यादीचे भावास तलवारीने, दगडाने मारहाण करून गंभीर जखमी केले व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी जेजेराव पंडीत डोंगरे, वय 30 वर्षे, व्यवसाय चालक रा. वाळकी बु. ता. लोहा जि. नां देड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 139/2024 कलम 326,324,504,506,143,147,148,149 भादवि सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1119 श्रीमंगले, मो. नं. 9511645433** हे करीत आहेत.

**4)भाग्यनगर :–**दिनांक 25.05.2024 रोजी 18.42 वा. ते 20.47 वा. चे दरम्यान, **मोर चौकाकडुन छत्रपती चौकाकडे जाणारे रोडवर मध्यभागी पार्कींग मध्ये नांदेड येथे**, यातील फिर्यादीस यातील नमुद आरोपी व ईतर चार आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवून फिर्यादीस व्हॉटसअप कॉल करून त्याचे वाढदिवसाला विश करून त्यांना भेटायला ये असे म्हणुन बोलावून घेवून त्यांना म्हणाले की कारे तुला माज आला का मी सांगीतलेल्या गाडया सोडत नाहीस का तुला दाखवू का असे म्हणुन गालात थापड मारली व सोबतच्या चार जणांनी शिवीगाळ करून थापडा बुक्यांनी मारहाण केली व चाकुचा धाक दाखवून तुला मी आता संपवतो असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली अश्लिल शिवीगाळ करून फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन किंमती 70,000/– रूपयांची चोरून घेतली. वगैरे **फिर्यादी सुदर्शन वसंतराव देवढे, वय 27 वर्षे, व्यवसाय नौकरी सहा. मोटार वाहन निरीक्षक ने. प्रादेशिक परीवहन कार्यालय, नांदेड रा. यशनगरी काबारानगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 223/2024 कलम 379,294,323,504,506, 143,147,148,149 भादवि सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री चिटमपल्ले, मो. नं. 9518973185** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**इतवारा :–** दिनांक 25.05.2024 रोजी 06.30 वा. ते 07.30 वा. चे दरम्यान, **हैदरबाग देगलुर नाका, नांदेड येथे**, यातील फिर्यादीचे घराचे उघडे दारातुन आत प्रवेश करून सॅमसंग कंपनीचा मोबाईल व एच.पी. कंपनीचा लॅपटॉप असा एकुण किंमती 25,000/–रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सय्यद अरसलान अब्दुल्ला सय्यद शाहिद अलहक, वय 24 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. हैदरबाग देगलुर नाका, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 184/2024 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2556 दासरवार, मो.क्रं. 9657716873** हे करीत आहेत.

## 5)जनावर चोरी :–

**नायगाव :–** दिनांक 28.05.2024 रोजी 19.30 वा. ते दिनांक 29.05.2024 रोजी 05.00 वा. चे दरम्यान, **मौ. गोदमगाव शिवार नायगाव ता. नायगाव जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीचे शेतात बांधलेले तीन बैल जनावरे एकुण किंमती 71,000/–रूपयाचे नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी भुजंगा मारूती शिंदे, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. गोदमगाव ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 118/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पंडित, मो.क्रं. 9923184058** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**1)बिलोली :–** दिनांक 01.12.2021 ते दिनांक 03.04.2022 रोजी पावेतो, **फिर्यादीचे सासरी व माहेरी बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे**, यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस चारित्र्याचा संशय घेवून कार घेण्यासाठी माहेरहुन दोन लाख रूपये घेवून ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 29 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 83/2024 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2351 मुद्देमवार, मो.क्रं. 9049778709** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 05.05.2024 रोजी 11.30 वा. ते दिनांक 21.05.2024 रोजी 11.00 वा. चे दरम्यान, **नविन पावडेवाडी नांदेड ह.मु. पांडुरंग नगर, नांदेड येथे**, यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी घरबांधकाम करण्यासाठी तुझ्या माहेरहुन एक लाख रूपये घेवून ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 224/2024 कलम 498(अ),323,504,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोहेकॉ/2525 कळगेंद्रे, मो.क्रं. 9657721311** हे करीत आहेत.

## 7)प्राणी संरक्षण अधिनियम :–

**हदगाव :–** दिनांक 29.05.2024 रोजी 10.00 वा. चे सुमारास, **येळंब फाटा ता. हदगाव जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या स्वताचे आर्थिक फायदया करीता सात रेडे जनांवरे एकुण किंमती 21,000/–रूपयाचे बोलेरो पिकअप क्रमांक एमएच–26/बीई–7253 मध्ये निर्दयीपणे क्रुरपणे कोंबुन कत्तल करण्यासाठी घेवून जात असताना वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/900 बालाजी व्यंकटी सातपुते, ने. पोस्टे हदगाव** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 140/2024 कलम 11(1)11(ड)(इ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976 व मोटार वाहन अधिनियम 1988 चे कलम 125 (ई) कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहकॉ/900 सातपुते, मो. नं. 9823216771** हे करीत आहेत.

## 8)भारतीय हत्यार कायदा :–

**1)इतवारा :–**दिनांक 29.05.2024 रोजी 14.00 वा. ते 14.25 वा. चे दरम्यान, **गोदावरी घाट नदीपात्रात, नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या एक गावठी पिस्टल व दोन जिवंत काडतुस आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1019 श्रीराम गंगाधर दासरे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 185/2023 कलम 3/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/664 हाके, मो.क्रं. 8320000664** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–**दिनांक 29.05.2024 रोजी 18.50 वा. चे सुमारास, **मुंजेश्वर मंदिरा समोर जुनागंज इतवारा, नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या एक खंजर बाळगुन फिरत असताना आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/2117 धिरजकमुमार गंगाधरराव कोमुलवार, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 187/2023 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2543 चाउस, मो.क्रं. 8805012394** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड